# महाराष्ट्र शासन

सहसंचालक

उच्च शिक्षण मुंबई विभाग, मुंबई

एलफिस्टन तंत्र विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई-४०० ००१

ई.मेल- Jdhe_mumbai@rediffmail.com दुरध्वनी क्रमांक-022&22691528@22656600


क्र. सहस/उशि/मु.वि./३३/२००९ / १२३५ दिनांक- २३/७/२००९

## प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की, शासन आदेश क्र. एनजीसी-२००९/(१५२/०९)/मशि-४, दि.११/७/२००९ नुसार, जोगेश्वरी एज्युकेशन सोसायटी,२१ सरस्वती बाग, जागेश्वरी (पू.) मुंबई–६०, या संस्थेस, जागेश्वरी (पू.) मुंबई–६० या ठिकाणी सन २००९-१० या वर्षाकरीता परिच्छेद २ व ३मधील अटी व शर्तीना अनुसरुन तात्पुरती (provisional ) स्वरुपात पदवी स्तरावर **वाणिज्य आणि विज्ञान विद्याशाखेच्या नवीन महाविद्यालयास** कायम विना अनुदान तत्वावर सुरु करण्यास परवानगी दिली आहे. शासन आदेशातील नमुद केलेल्या अटी व शर्तीना अनुसरुन संस्था/ महाविद्यालयाकडून रु.१००/- भारतीय गैर न्यायिक मुद्रांक पेपरवर नवीन अभ्यासक्रम चालविण्यासाठी शासनाकडून भविष्यात कोणत्याही परिस्थितीत अनुदानाची मागणी केली जाणार नाही असे हमीपूर्वक हमीपत्र शासननिर्देशाप्रमाणे या कार्यालयाकडे सादर केलेला आहे.

"महाराष्ट्र विद्यापीठ कायदा-१९९४" अंतर्गत तरतुदीनुसार मर्यादीत विद्यार्थी प्रवेश आणि यु.सी.जी. कडील मार्गदर्शक तत्वानुसार शैक्षणिक अर्हताधारक अध्यापक वर्ग व शिक्षकेत्तर कर्मचारी वर्ग नियुक्त करण्यास तसेच शासन आदेशातील सुचनांप्रमाणे विद्यापीठाने या संस्थेच्या/महाविद्यालयाच्या वर उल्लेखित नविन महाविद्यालय/ विषय/तुकड्या/विद्याशाखा/ अभ्यासक्रमांसाठी पुढील संलग्नीकरणाची प्रक्रिया सुरु करण्यास या कार्यालयाची हरकत नाही.

स्थळ-मुंबई-४०० ००१

दिनांक २३/७/२००९

सहसंचालक

उच्च शिक्षण मुंबई विभाग, मुंबई

प्रत,

१) कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई.

२) कुलसचिव, एस. एन.डी.टी. महिला विद्यापीठ, मुंबई-२०

तसेच त्यांना कळविण्यात येते की, विद्यापीठांनी त्यांच्या संलग्नीकरणात येत असलेल्या या महाविद्यालयाच्या वरील मंजूरी मिळालेल्या अभ्यासक्रमांचे विद्याशाखांचे/विहित शैक्षणिक शुल्क विद्यार्थ्यांना पुरविण्यात येणा-या भौतिक सुविधा, पात्रताधारक अध्यापक वर्ग व तत्सम स्वरुपाच्या आवश्यक असणा-या बाबी पूर्ण करण्याच्या सुचना तसेच बार कौंसिल ऑफ इंडिया, एन.सी.टी.ई,/ एआय. सी.टी.ई, यांचेकडील ना हरकत प्रमाणपत्र तात्काळ प्राप्त करण्याच्या सूचना पुनः संस्थेच्या/महाविद्यालयाच्या निर्देशनास आणून द्याव्यात.

ही मान्यता फक्त शैक्षणिक वर्ष २००९-१० पूर्वी मर्यादित असल्याने या वर्षी नवीन महाविद्यालय/ अभ्यासक्रम/ विद्याशाखा/विषय/तुकड्या सुरु न केल्यास ही मान्यता आपोआप रद्द होईल. तसेच शासन आदेशानुसार कळविण्यात आल्याप्रमाणे शासनाने दिलेल्या अटी व शर्ती यांचे पालन होते किंवा नाही याबाबत खात्री करुन संलग्नीकरणाचा अहवाल शासनास व संचालनालयास पाठवून केलेल्या कार्यवाहीची प्रत या कार्यालयास पाठवावी.